# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
| **EE/CGRF/LTR/158** | | **Date :- 23.10.2019** |

**ग्राहक तक्रार क्र.** : २०/२०१९
**तक्रार दाखल दिनांक** : २४.०९.२०१९

**प्रति,**
१. **श्री. सिद्राम आबा खरात**
तेर. ता. जि. उस्मानाबाद.

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, तेर

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. २०/२०१९ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन श्री. सिद्राम आबा खरात, तेर ता.जि. उस्मानाबाद यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर
**प्रतिलिपी :-**
१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, उस्मानाबाद
२) कार्यकारी अभियंता (प्र) म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, उस्मानाबाद
३) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, उस्मानाबाद

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक : २०/२०१९ ( दाखल दिनांक : २४.०९.२०१९ )**

**श्री. सिद्राम आबा खरात**

**तेर. ता. जि. उस्मानाबाद** **--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, तेर** **-- गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **:** | **अध्यक्ष** |
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **:** | **सदस्य** |
| | **श्री. जी. एन. गायकवाड** | **:** | **सचिव** |

## निकाल

**दि. २३.१०.२०१९**

१) ग्राहक/अर्जदार, (ग्राहक क्र. ५९००३०१३०८८१) यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि. २४.०९.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यानुसार ग्राहकाचे असे म्हणणे आहे की,

२) विज बील वाणिज्य (Commercial) वापराचे येत आहे. माझा व्यवसाय हा घरगुती हॉटेल चालवणे असून माझे घर व हॉटेल दोन्ही एकाच जागेमध्ये आहेत. दोन्हीचा मिळुन वीज वापर अतिशय कमी म्हणजेच मासिक सरासरी ८० ते ८५ युनिट आहे. या कारणास्तव ग्राहकाचे असे म्हणने आहे की, त्याला वाणिज्य वापराऐवजी घरगुती विज वापराचे दरमहा विज बिल देण्यात यावे. अन्य कोणतीही तक्रार नाही.

३) गैर अर्जदार/महावितरण तर्फे श्री. भालचंद्र विठ्ठलराव चाटे, उप.कार्यकारी अभियंता, उपविभाग, तेर यांनी त्यांची बाजु अशी मांडली की, महावितरण कंपनीने वाणिज्य वापरासाठी वीज मीटर दिलेले आहे. हॉटेल हे मुख्य रस्त्यावर व मेन बस स्टँड समोर आहे. हॉटेलचा लोड १२९२ वॅट आहे. त्यांचा घरगुती वापर हा अत्यंत कमी १२८ वॅट आहे. ग्राहकाचा वीज वापर हॉटेलसाठी जवळपास ९० टक्के आहे. ही सद्य परिस्थिती महावितरणने दि.१५.१०.२०१९ च्य स्थळतपासणी अहवालामध्ये नमुद केली असुन त्याची प्रत त्वरीत ग्राहकास देण्यात आली आहे. या अहवालाबाबत ग्राहकाने महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केलेली नाही. ग्राहक सदरचा स्थळ पाहणी अहवाल नाकारु शकत नाही. घरगुती विजेचा वापर कमी असुन वाणिज्य विजेचा वापर जास्त आहे. यावरुन असे दिसते की, ग्राहकाचा मुख्य वापर हा वाणिज्य कारणासाठी होतो त्यामुळे ग्राहकास फक्त घरगुती वापराचे विज बिल देता येणार नाही.

# निष्कर्ष

४) मंचाने ग्राहकाची व गैर अर्जदाराची बाजु ऐकुण घेतली व या निष्कर्षापर्यंत ग्राहकाचा वीज वापर हा वाणिज्य कारणासाठी म्हणजेच हॉटेलसाठी होत असल्याचे दिसुन येते. तसेच हॉटेल हे मुख्य रस्त्यावर आणि मुख्य बस स्टँड समोर आहे. या वरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचा मुख्य वीज वापर हा हॉटेलसाठी होत आहे. महावितरच्या अधिकाऱ्यांनी मंचाचे लक्ष परिपत्रक क्र. २८४ ता. ११.०४.२०१७ कडे वेधले असता. त्यावरुन असे दिसुन येते की, महावितरणने तयार केलेला दि. १५.१०.२०१९ चा अहवाल बरोबर आहे. मी पुन्हा असे नमुद करु इच्छितो की, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ग्राहकाचा विज वापर कशा प्रकारे होतो याचे सविस्तर वर्णन अहवालात दिले आहे. ते खालील प्रमाणे आहे.

**१) वाणिज्य वापर :-**

| Sr. | | No. | Watts | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | D-Fridge | 1 | 400 | 400 |
| 2 | Fridge | 1 | 200 | 200 |
| 3 | CFL | 3 | 11 | 33 |
| 4 | CFL | 1 | 9 | 9 |
| 5 | Inverter | 1 | 500w | 500 |
| 6 | Tube | 1 | 40 | 40 |
| 7 | Fan | 3 | 60 | 180 |
| 8 | CCTV | 1 | 50 | 50 |
| | Total | | | 1292 Watts |

**२) घरगुती वापर :-**

| Sr. | | Watt | Total Watts |
|---|---|---|---|
| 1 | CFL | 2 x 9 = | 18 |
| 2 | Fan | 2 x 60 = | 120 |

या कारणास्तव मंचाचे असे स्पष्ट मत आहे की, महावितरणने ग्राहकास दिलेले वाणिज्य विज वापराचे बिल बरोबर आहे. याबाबत तक्रार करण्याचा अधिकारी ग्राहकास प्राप्त होत नाही.

५) दुसरा एक अनाकलनिय मुद्दा ग्राहकातर्फे उपस्थित करण्यात आला तो असा की, त्याच्या मते तेर गावामध्ये असे अनेक व्यवसाय करणारे लोक आहेत त्यांच्याकडे घरगुती व वाणिज्य विज वापर चालु आहे पण त्यांच्याकडे वाणिज्य विज वापर जास्त असताना सुध्दा त्यांना घरगुती वापराचे बिल देण्यात येते. त्या लोकांना वगळून फक्त ग्राहकास वाणिज्य वापराचे बिल देण्यात आले आहे, जे कायद्यास धरुन नाही. याबाबत मंचाचे असे मत आहे की, हा मुद्दा स्वतंत्र तक्रार दाखल करुन ग्राहकाने सक्षम अधिकाऱ्याकडे उपस्थित करावा. मंच याबाबत दखल घेऊ शकत नाही.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्म मधील तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

२) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय अमान्य असल्यास मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत 'ब' फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म 'ब 'या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल

महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,

प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,

नागपूर-४४००१३.

दुरध्वनी क्र.०७१२-२०२११९८

ठिकाण : - लातूर

दिनांक :-२३.१०.२०१९

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर. |